दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.४ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २१८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 4 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 218 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## सुधीर मुनगंटीवार विधानसभेत पुन्हा भडकले

# इंग्रजीचा आग्रह धरणाऱ्यांना पासपोर्ट व्हिसा काढून थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रात हिंदी - मराठीच्या मुद्यावरून मोठे वादंग माजले आहे. या प्रकरणी सत्ताधारी व विरोधकांत राजकीय चिखलफेक झाली. त्यानंतर आज विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत पुन्हा एकदा भाषेचा मुद्दा उपस्थित झाला. पण यावेळी भाषा होती ती म्हणजे इंग्रजी. या प्रकरणी सत्ताधारी भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहाच्या इंग्रजी कार्यक्रम पत्रिकेवर तीव्र आक्षेप घेतला.त्याचे झाले असे की, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज प्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असणाऱ्या ऊर्जा खात्याच्या कारभारावर तोंडसूख घेतले. त्यानंतर औचित्याचा मुद्दा उपस्थित करत कामकाजाची पत्रिका इंग्रजीत छापल्यावर तीव्र आक्षेप नोंदवला.महाराष्ट्र विधानसभा नियमांत कामकाज मराठी, हिंदी, इंग्रजीत चालेल अशी तरतूद नक्कीच आहे. पण साधारणपणे मीही १९९५ पासून या सभागृहात आहे. यापूर्वी आपली कार्यक्रम पत्रिका मी केव्हाच इंग्रजीत पाहिली नाही, असे ते म्हणाले. त्यावर समोरच्या बाकांवरून हे पहिल्यापासून आहे, असे उत्तर आले. त्यावर मुनगंटीवार यांनी त्यांनाच कडक शब्दांत सुनावले.

ते म्हणाले, ऐकूण तर घ्या ना. पहिल्यापासून आहे म्हणजे? सनदी अधिकाऱ्यांना आपण मराठी शिकवायला लावतो. इकडे मराठी अभिजात भाषा करायची व मराठी ज्यांना बोलता येत नाही, त्यांना हिंदीची संधी असताना जबरदस्तीने इंग्रजी वापरायला सांगायची. मग हिंदीत बोलावे. कार्यक्रमपत्रिका हिंदीत घ्यावी. हिंदीच्या सक्तीला विरोध करायचा आणि इंग्रजीवर प्रेम दाखवायचे. इंग्रजीला आलिंगन द्यायचे. हा माझा आक्षेप आहे.सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी नियमावलीतून इंग्रजी शब्द काढून टाकण्याचीही मागणी केली. महाराष्ट्र विधानसभा नियम तयार करताना इंग्रजीचा प्रभाव असेल. माझी विनंती आहे. एकदा नियम समितीची बैठक घ्या. इंग्रजी शब्द जिथे - जिथे असेल तो तिथून काढून टाकावा. मराठी शिकलीच पाहिजे. अभिजात भाषा आहे. समजा एखाद्याला खूप अडचण असेल तर हिंदी आहे. पण फारच इंग्रजीशिवाय समजत नसेल तर पासपोर्ट - व्हिसा काढून अशांना थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा. ही काय पद्धत आहे?, असे ते आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

सुधीर मुनगंटीवार यांच्या आक्षेपानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. सुधीरभाऊ, माध्यमांना हिंदी व मराठीवर लिहायला खूप काही आहे. आता तुम्ही त्यात इंग्रजीची भर घालू नका, असे ते म्हणाले. त्यांनी हे म्हणताच सभागृहात हास्याची लकेर उमटली. नियम २२ नुसार सभागृहात कोणत्या भाषेत चर्चा करता येते हे सर्वांना माहिती आहे. त्यानुसार आपण सुरुवातीपासून इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांमध्ये कामकाज पत्रिका तयार करतो. त्याशिवाय माझ्याकडे कामकाज पत्रिका इंग्रजीत देण्यात यावी अशी इतरही ८ सदस्यांची विनंतीही आली आहे, असे नार्वेकर म्हणाले.



## साने गुरुजी दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारी एकमेव शाळा-गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर

**केज । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारे जिल्ह्यातील एकमेव शाळा म्हणून बीड जिल्ह्यात सानेगुरुजी निवासी विद्यालय केज ने शिक्षण क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. आज नवीन शैक्षणिक वर्षाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके शालेय दप्तर चे वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केज तालुका गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य / मुख्याध्यापिका डॉ कविता गित्ते हरिभाऊ पाटोळे , उत्तम मोती, बाबासाहेब चाटे, यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.



यावेळी शाळेतील प्रवेशित सर्व निवासी विद्यार्थ्यांना वह्या , पुस्तकं, दप्तर ,इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या शैक्षणिक साहित्यांचे वाटप कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना बेडसकर म्हणाले की विद्यार्थ्यांना दिलेले शैक्षणिक साहित्य अतिशय दर्जेदार व चांगल्या प्रतीचे आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात साडेसातशे मुलांचं निवासी वसतिगृह चालवणं व त्यांना दर्जेदार सुविधा देणे हे सोपे काम नाही. खरंच सदर शाळा व वसतिगृह हे अतिशय वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी चालतं याचा केज तालुक्याला अभिमान आहे. फक्त वस्तीग्रह व शाळा चालवायची म्हणून सदर शाळा चालत नसून एक मॉडेल स्कूल सध्या बीड जिल्ह्यात साने गुरुजी आहे असाही मत त्यांनी व्यक्त केलं. त्याबद्दल संस्था आणि शाळा प्रशासनाचे कौतुकही केले तसेच मुलांना या नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा सिरसाट यांनी केले तर आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक हरिभाऊ पाटोळे यांनी आभार मानले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध व आनंददायी वातावरणात पार पडला.

## श्री नृसिंह संगीत विद्यालयाला अधिकृत परिक्षा केंद्रास मान्यता




**केज । प्रतिनिधी**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई द्वारा केज येथील श्री नृसिंह संगीत विद्यालयाला अधिकृत मंडळाचे परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे.प्रारंभिक ते प्रवेशिका पूर्ण अशा पहिल्यातील तीन परीक्षांसाठी गायन, वादन,तबला,पखावज या विषयांसाठी आपण परीक्षा फॉर्म भरू शकता.डिसेंबर २०२५ या सत्रासाठी केंद्र क्रमांक १२६८ हा क्रमांक निवडून आपण परीक्षा फॉर्म भरावेत असे आवाहन संचालक श्री भालचंद्र देव मो.नं. ८२३७१५०८४५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.दरम्यान केज शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात मिळालेल्या उपलब्धीबद्दल सर्व संचालक व शिक्षक यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## विवेकवर्धिनी शाळेच्या डीपी भोवती झाडांचा विळखा काढला

### ॲड.मनोज संकाये यांच्या तातडीच्या मागणी नंतर महावितरणचा झपाट्याने प्रतिसाद!

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

शहरातील शारदा नगर परिसरातील विवेकवर्धिनी शाळेजवळील महावितरणच्या डीपीभोवती झाडे, वेली व झुडपांनी घातलेला विळखा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला गंभीर धोका ठरत होता. सुरू असलेल्या पावसाळ्यात वाऱ्यामुळे विद्युत तारांमध्ये शॉर्टसर्किट होण्याची शक्यता वाढली होती. या परिसरात दररोज शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवाशी थेट संबंध असलेला प्रश्न निर्माण झाला होता.

ही गंभीर बाब हेरून सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी तात्काळ पुढाकार घेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्या, अन्यथा अपघाताची जबाबदारी महावितरणवर राहील अशी ठाम भूमिका घेत महावितरणकडे तातडीने कारवाईची मागणी केली होती.

संकाये यांनी स्पष्ट केले की, शाळेच्या डीपीभोवती वाढलेली झाडं व वेली विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्यासारखी परिस्थिती निर्माण करत आहेत. त्यामुळे महावितरणने झपाट्याने उपाययोजना करणे गरजेचे आहे. या मागणीची दखल महावितरण विभागाने लगेच घेतली असून, बातमी प्रसिद्ध होताच अवघ्या एका दिवसात डीपीवरील सर्व झाडं, वेली व झुडपे हटविण्यात आले. परिणामी, परिसर पुन्हा सुरक्षित झाला असून संभाव्य धोका टळला आहे. या जलद कारवाईमुळे शाळेतील



शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांच्या जागरूकतेला आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण बाब ठरलेल्या या प्रकरणात लोकप्रतिनिधींनी आणि शासकीय यंत्रणांनी तत्परतेने प्रतिसाद दिल्यास समाजात जनतेचा विश्वास अधिक बळकट होतो, हे या घटनेतून सिद्ध झाले आहे.

## जिल्हाधिकारी जॉन्सन बनले निक्षय मित्र!

### जिल्ह्यातील इतरांनीही निक्षय मित्र बनण्याचे आवाहन

### प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान

**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन निक्षय मित्र बनले. जिल्ह्यातील पाच क्षय रूग्णांना जिल्हाधिकारी यांनी सहा महिन्यांसाठी दत्तक घेत त्यांना आज पोषण कीटचे वाटप केले.

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय टीबी मुक्त भारत अभियान, टीबी फोरम व टीबी कोमोर्बीडीटीच्या जिल्हा समन्वय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन



यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात झाली. जिल्ह्यात एकूण एक हजार २३९ क्षय रुग्ण उपचार घेत आहेत. त्यापैकी ३५० रूग्णांना निक्षय मित्र यांच्यामार्फत निक्षय पोषण आहार किटचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षयरुग्णांना निक्षय पोषण आहार कीट उपलब्ध करून देण्यासाठी विविध घटकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन श्री. जॉन्सन यांनी केले.


बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेशकुमार माने, वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल चव्हाण, आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




**बीड : सत्यकथा बळीराजाची ठिणगी संसाराची चित्रपटाचे अभिनेते डॉ. महेश वनवे यांनी जीव्हाळा केंद्रातील निराधारांना आज दि. ३ जुलै २०२५ रोजी ठेणवी संसाराची चित्रपट संतोषी माताचित्रपट गृहामध्ये दाखवण्यात आला. यावेळी जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य ,व्यवस्थापक राजू वंजारे, छायाताई सरोदे, डॉ. संजय तांदळे, जितेंद्र शिरसाट सह जिव्हाळा केंद्रातील लाभार्थी बहुसंख्येने उपस्थित होते**

## संपादकीय..

# विज्ञानातला एक ध्रुवतारा



जयंतराव नारळीकर आपल्यातून निघून गेले ही बातमी सकाळी ऐकली आणि खूप बेचैन झालो. याचे कारण विज्ञानातला खरं म्हणजे एक ध्रुवताराच निखळला होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर खऱ्या अर्थाने विज्ञानावर संशोधन करणाऱ्यांपैकी आणि भारतात परत येऊन भारतामध्ये वैज्ञानिक संशोधन आणि विवेकवादी तसेच विज्ञानवादी दृष्टिकोन वाढवण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले त्याला आपल्या सगळ्यांचा सलाम !

नारळीकर हे फक्त वैज्ञानिक नव्हते, तर ते विज्ञान लेखक आणि साहित्यिकही होते. दुर्गा भागवतांनी त्यांच्या विज्ञानकथांचे खूप कौतुकही केले होते. त्यांचे यक्षाची देणगी हे पुस्तक वाचून मी खूप भारावून गेलो होतो. त्यानंतर त्यांची टाईम ट्रॅव्हल, अवकाशातले स्फोट अशा अनेक विषयांवरची पुस्तके वाचली. मग त्यांच्या कादंबऱ्या झाल्या. त्यांनी मराठी साहित्यात एवढी भर घातली की. २०२१ सालचे साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदह त्यांनी भूषवले.

पण खरं त्यांचे योगदान हे विश्वविज्ञान किंवा कॉस्मोलॉजी याविषयीचे होते. नारळीकर केंब्रिजला गेले, तिथे रँगलर झाले, फ्रेड हॉईल या तिथल्या प्रसिद्ध वैज्ञानिकाच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले आणि त्यांच्याचबरोबर हॉईल-नारळीकर थेअरी मांडली. गेल्या शतकात विश्वनिर्मितीच्या विषयी दोन महत्त्वाचे विचार किंवा थेअरीज निर्माण झाल्या. एक म्हणजे बिग बँग आणि दुसरी म्हणजे स्टेडी स्टेट. बिग बँगच्या थेअरीप्रमाणे विश्व एका बिंदूपासून स्फोट होऊन निर्माण झाले आणि ते प्रसरण पावत राहिले. पण त्याविरुद्ध हॉईल आणि नारळीकर स्टेडी स्टेटची थेअरी मांडत होते. काही दशकं हा वाद खूपच रंगला. पण शेवटी १९७० च्या दशकात बॅकग्राऊंड मायक्रोवेव्ह नॉईज अमेरिकेतल्या न्यू जर्सीमध्ये सापडला आणि त्यामुळे बिग बँगची थेअरी सिद्ध झाली असं कित्येक वैज्ञानिक मानायला लागले.

प्रत्यक्षात नारळीकरांची थेअरी किती बरोबर आणि किती चूक यापेक्षा त्यांच्या संशोधनाचा स्तर हा आंतरराष्ट्रीय कॉस्मोलॉजीमध्ये किती मोठा होता हे आपल्या लक्षात येईल. आणि एवढ्या मोठ्या माणसाने मराठीवर प्रेम म्हणून मराठीमध्ये अनेक पुस्तके लिहिली. त्यांचे मआकाशाशी जडले नातेफ हे पुस्तक प्रत्येकाने वाचलेच पाहिजे असे आहे. इतक्या सोप्या मराठी भाषेत कॉस्मोलॉजी सामान्यांना कळेल अशा भाषेत सांगणं म्हणजे काही चेष्टा नव्हती. मी किमयागार लिहिताना नारळीकरांमुळे खूपच प्रेरित झालो होतो.

१९७२ साली इंदिरा गांधींच्या आग्रहामुळे नारळीकर भारतात परत आले आणि त्यांनी या देशाच्या वैज्ञानिक प्रगतीसाठी खूप मोठी कामगिरी केली याचा मला खूप अभिमान आहे. प्रथम टीआयएफआर आणि नंतर आयुका अशा दोन्ही ठिकाणी त्यांनी अतिशय उत्कृष्ट अध्ययन आणि संशोधन या दोन्ही बाबतीत प्रचंड काम केले. अर्थातच त्यांना पद्मभूषण, पद्मविभूषण, महाराष्ट्रभूषण अशा अनेक सन्मानांनी भूषवले यात काही नवल नव्हते. त्यांचा साधेपणा मला नेहमी भावायचा. आयआयटीनंतर एक वर्षभर मुंबईमध्ये मी जी भटकंती केली त्यात टीआयएफआरमध्ये सुद्धा अनेकदा मी जायचो. त्यावेळेला नारळीकर तिथे अनेकदा दिसायचे. मुंबईला आकाशवाणीच्या ऑडिटोरियममध्ये त्यांचे एकदा भाषण होते.

अतिशय शांतपणे बोलणे आणि अवघड संकल्पना सोप्या करून सांगणे हे मला आयुष्यभर खूपच महत्त्वाचे वाटले आहे. कॉस्मोलॉजी आणि गणित यात तर त्यांची मास्टरी होतीच पण त्याशिवाय त्यांना अनेक विषयात रस असायचा. एकदा त्यांचा मला असाच फोन आला. ते म्हणाले अच्युत, तुझं अर्थात हे पुस्तक आत्ताच वाचून संपवले. अर्थशास्त्रावरती मराठीमध्ये इतकं सोपे आणि सुंदर पुस्तक मी अजून वाचलेले नाही. आणि यानंतर ते बराच वेळ बोलत राहिले. माझा ऊर तर भरून आलाच, पण मला एका गोष्टीचं सतत आश्चर्य वाटत राहीले. एवढा मोठा वैज्ञानिक अर्थशास्त्रसारख्या विषयात रस घेतो, मन लावून ते पुस्तक वाचतो आणि नंतर लेखकाला त्याची दाद आणि पावतीही देतो हे मी कधीही विसरणार नाही.

ज्योतिषाविषयी त्यांची मतं खूप परखड होती. (खरं म्हणजे विवेकानंदांची सुद्धा तेवढीच परखड मतं होती हे कित्येकांना माहीत नसेल. यासाठी दत्तप्रसाद दाभोळकरांचं पुस्तक वाचावं). यामुळे नारळीकरांना श्रद्धांजली जर का द्यायची असेल, तर आपण यापुढे अंधश्रद्धेला बळी पडणार नाही आणि वैज्ञानिक आणि विवेकवादी दृष्टिकोन अंगीकारू अशी आपण शपथ घेतली, तर ती खरी श्रद्धांजली ठरेल.

# वायू प्रदूषण एक अनभिज्ञ सत्य!



हल्ली सारखे ऐकायला मिळते की, हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. लहान मुलांना सुद्धा अॅटॅक येत आहे. का बरं? यावर संशोधन केल्यानंतर सर्वांप्रमाणे एकच ठोकताळा... श्वास घ्यायला होत नव्हता कारण कफ, इतर आजारपण, मानसिक त्रास, चिंता अनेक कारणे समोर आली. याचं कारण आपल्याला माहीत असले तरी पण आपण त्यावर मात करू शकत नाही, कारण आपण आता खूप पुढे गेलो आहोत. जेंव्हा मी खोलवर जाऊन यावर संशोधन केले तेव्हा एकच उत्तर मिळाले वायू प्रदूषण. हे एक अनभिज्ञ सत्य आहे.

पृथ्वीभोवती वातावरणाचे मुख्यत: ५ थर आहेत. ज३ ल रेणूपासून तयार झालेला पृथ्वीच्या वातावरणातील 'ओझोन' हा एक वायू आहे जो पृथ्वीच्या वातावरणातील दुसरा थर असून त्याची निर्मिती नैसर्गिकरीत्या झाली आहे. ज्याची उंची ७.५ ते ३० मैलांपर्यंत आहे. यातील ओझोनचा थर हा सूर्यकिरणातील हानिकारक अतिनील किरणे शोषून घेतो. यामुळे आपल्या पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे रक्षण होते. ओझोनचा उपयोग निर्जंतुकीकरण करणे, जलशुद्धीकरण करणे यासाठी होतो. पृथ्वीच्या वातावरणातील वायूचा एक गट आहे ज्यामध्ये इन्फ्रारेड किरणोत्सर्ग शोषण्याची क्षमता असते. म्हणजेच हरितगृह वायू. हरितगृह वायू हा वातावरणातील उष्णता अडकवून ठेवतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. हा हरितगृह वायू पृथ्वीला उबदार ठेवतो. कार्बनडाय-ऑक्साइड, पाण्याची वाफ, मिथेन, नायट्रोसॉक्साईड यांच मिश्रण म्हणजे हरितगृह वायू.

या पृथ्वीवर अद्भुत शक्तीने नैसर्गिकरीत्या सर्वच सजीव सृष्टीसाठी पूरक अशीच नैसर्गिक संरक्षणात्मक संयोजना केली आहे. सर्व सजीव सृष्टीतील मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी ज्या काही योजना आखल्या त्यातून या निसर्गाचा फक्त विध्वंस झाला आहे. त्यातील सर्वात मोठा हा प्रदूषण या मार्गाने होत आहे आणि तो सातत्याने केला जात आहे.

'वायू प्रदूषण' म्हणजे द्रव कण, धुळीचे घनकण आणि हानिकारक वायूचे मिश्रण. त्यासाठी अनेक स्त्रोत आहेत. अगदी घरातील देवपूजेपासून ते स्वयंपाक, वीज निर्मिती वाहतुकीकरण, कचरा जाळणे, शेतीमधील विविध कार्य पद्धती, वीज निर्मिती, औद्योगिक चिमण्या, बांधकाम आणि उच्च कोटींचे म्हणजे युद्ध असे अनेक स्त्रोत या वायू प्रदूषणास कारणीभूत आहेत. म्हणजे आपण २४ तास पूर्णपणे घेणारा अमृततुल्य श्वास हा पूर्णपणे विषारी आहे. मानवी क्रियाकलापांमुळे दिवसेंदिवस या प्रदूषणासोबत ओझोनचा थर कमी होत चाललाच आहे. जर याची अतिनील किरणे मानवापर्यंत पोहोचली, तर येथील इतर घटकांचा अंत होणारच; परंतु मानवाची रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन अनेक रोगांनी ग्रस्त होईल ज्यावर औषधं सुद्धा काम करणार नाहीत आणि शेवट अंत.

मूलभूत मानवी हक्क अनेक आहेत त्यातीलच एक शुद्ध हवा; परंतु आरोग्यासाठी सर्वात मोठा असणारा धोका जो वायू प्रदूषणामुळे निर्माण होतो तो म्हणजे हृदयविकाराचा झटका. आता हृदयविकाराचा झटका हा खूप सहज झाला आहे. त्यातून जगण्याची शाश्वती नाहीच. आत्ताच्या काळात व्यायाम करणाऱ्यांना सुद्धा हृदयाचा झटका येतो त्याचे कारण प्रदूषित हवा. जंगलांपेक्षा शहरात सर्वच प्रकारचे प्रदूषण अति प्रमाणात झाले आहे. विशेषतः कोरोना नंतर झालेल्या प्रदूषणामुळे हार्ट स्ट्रोक हे अति प्रमाणात वाढले आहेत. आपण केलेले चुकीचे प्रकल्प म्हणजे पर्यावरणाला हानिकारक असे असल्यामुळे पूर्ण वातावरणातील कितीही प्रयत्न केला, तरी वायू प्रदूषण जे अति प्रमाणात होत आहे ते आटोक्यात येऊच शकत नाही. कारण आपल्या सुखसोयी या आपण इतक्या गंभीरपणे घेतल्या आहेत की, तिथे आपल्या मृत्यूला किंमत शून्य झाली आहे. ज्याचा आपण विचारच करत नाही. थक्ज नुसार वायू प्रदूषणाला या शतकातील सर्वात मोठा जागतिक आरोग्य धोका म्हणून ओळखला जातो. कारण या वायू प्रदूषणाच्या संपर्कात आल्यामुळे जगभरात सुमारे अंदाजे ४.५ दशलक्ष अकाली मृत्यू होतात. २.५ मायक्रोमीटरपेक्षाही कमी व्यासाचा प्रदूषक असणारा सूक्ष्म कण रक्त प्रवाहात प्रवेश करू शकतो. ज्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीत श्वसनरूप आणि कर्करोग होतात. दिवसेंदिवस या विश्वातील प्रत्येक देशात या वायू प्रदूषणामुळे श्वास घेण कठीण होईल, श्वसनाचे अनभिज्ञ असे आजार निर्माण होतील.वायू तत्त्वाला प्राण का म्हटले जाते? या वायू तत्त्वामुळे शुद्ध हवा जेव्हा प्रत्येक सजीवाच्या शरीरात प्रवेश करते तेंव्हा ती शरीरामधील रक्तप्रवाह शुद्धीकरण करत असते. जेंव्हा रक्त प्रवाह सुरळीत चालतो तेंव्हा आपले हृदय व्यवस्थित कार्य करते. म्हणजेच आपण परत मोकळा श्वास घेतो. हे चक्र प्रत्येक सजीव सृष्टीला जगवते आणि जर ही हवा अशुद्ध असेल, तर रक्ताभिसरण प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊन लहान मेंदूकडून मोठ्या मेंदूकडे रक्तप्रवाह होऊ शकत नाही शिवाय हृदयापर्यंत सुद्धा रक्त व्यवस्थित पोहोचू शकत नाही. ताजी आणि शुद्ध हवा सर्वच सजीव सृष्टीसाठी एक पोषक तत्त्व आहे ज्यामुळे आपल्या आरोग्याला होणारे फायदे नखशिखांत आहेत.वृक्ष लागवडीला महत्त्व यासाठी आहे की वनस्पती कार्बन डाय-ऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन टाकतात. जो या सजीवसृष्टीसाठी आवश्यक आहे. आत्ताच्या काळात पर्यावरण पूर्णपणे अशुद्ध झाल्यामुळे आपण कितीही प्राणायाम केले तरीही घेणाऱ्या श्वासात विषारी द्रव्य ही शरीरात जातातच. थोडक्यात काय तर या पृथ्वीवरील वायू प्रदूषणामुळे तापमान वाढून अनेक निकृष्ट तत्त्वेही या भूमीत, महासागरात, हवेत मिसळत आहेत. परिणामी सजीव सृष्टीवर होणारे घातक परिणाम. हवा शुद्धीकरणाच्या सरकारकडे अनेक प्रकल्प योजना आहेत; परंतु त्याचबरोबर प्रदूषित करण्याच्या सुद्धा वाटा आहेत. शहरांमध्ये हवा गुणवत्तेसाठी नियोजन आहे; परंतु शहरातील नागरिकांचा सहभाग यासाठी आहे का? या पृथ्वीवरील पर्वत हे प्रदूषण मुक्त करणारे सर्वात मोठे स्त्रोत आहे असे असताना आपण या पर्वताचा आपल्या प्रगतीच्या दृष्टीने हानीकारक प्रकल्प योजना करून आपल्याच हाताने आपला मृत्यू ओढवून घेत आहोत की नाही? या पंचतत्त्वांनी परिपूर्ण असणाऱ्या पृथ्वीचा विनाश हा आपण करीत आहोत.

# बालकांना जबाबदारीची जाणीव; व्हावी खुली चर्चा



चितन, मनन करून पालक दमले, पण कौमार्य अवस्थेतील बालकांना आवर घालण्यात कमीच पडत आहेत. बालकांची प्रत्येक बाबतीतील लींीळींूं इतक्या टोकाला पोहोचली आहे की त्यापुढे परिणामाचा विचार करण्याची सद्सदविवेक बुद्धी कामचं करत नाहीये. एकमेकांना चॅलेंज देणे आणि ते चॅलेंज जिंकण्यासाठी कुठल्याही पातळीवर जाण्याचे धाडस करणे ही बाब अनेक गंभीर घटनाकडे बालकांना वळवत आहे. याचे चिंतन होणे आणि प्रभावी उपाययोजना शोधणे आवश्यक झालं आहे.

काही मुद्दे परत परत विचारात घेणे महत्त्वाचे आहे. बालकं अशी का वागतात? हा प्रश्न प्रत्येक पालकांना पडतो आहे. पालक-बालक यांच्यातील दरी ही काही नवीन नाहीये. पालक-बालक यांच्यात वैचारिक द्वंद सुरूच आहे आणि काळानुसार सगळ्या संकल्पना बदलत जाणारचं आहेत. पालकांना ज्या गोष्टी खूप गंभीर वाटतात त्या बालकांना तितक्याशा गंभीर वाटतं नाही. नीतिमत्ता, प्रामाणिकपणा या सगळ्यांचा फारसा प्रभाव आता बालकावर दिसून येत नाही. बालक आपल्या पालकांच्या विचारांशी त्यांनी जपलेल्या नियमांशी तितकेसे जोडलेले पण नाही. ज्यांच्या घरी कधी कोणी डान्स बारमध्ये गेल्याचा इतिहासच नाही किंवा त्याचं नाव देखील घरी काढलं जात नाही अशा घरची एक बालिका आपल्या मित्रासोबत घरी काहीही न सांगता जात असे. तिच्या सोबत तिथे वाईट प्रकार घडला आणि नंतर ती स्वतःच तिकडे कुतूहल म्हणून गेली होती. तिला कोणीही जबरदस्ती तिथे घेऊन गेले नव्हते ही माहिती समोर आली. पण तिथे तिच्या सोबत जे घडले ते तिच्या मर्जीने नव्हते त्यात तिची इच्छा सामील नव्हती हे बालिकेने सांगितले. अर्थात तिथे जाणे हे काही वाईट वगैरे नाही, असे विचार बालिकेने तिच्या मित्र-मैत्रिणींकडून ग्रहण केले होते आणि ते तिला बरोबर वाटले होते. म्हणून ती तिथे गेली इथपर्यंत तिला तिचं काही चुकलं असे नाही वाटले आणि पुढे जे काही झाले ते तिच्या सोबत चुकीचे झालं असं तिचं सांगणं होतं. जे घडलं तो गुन्हा होताच पण हा टाळता आला असता हे पालकांचे विचार होते. यात नेमकं द्वंद काय तर चूक बरोबर या संकल्पनामध्ये होत जाणारा बदल. या बदलामुळे पालक-बालक यांच्यात निर्माण होत जाणारी दरी. ही दरी डोहात रूपांतरित होत जाते आणि पालक बालकांच्या विश्वातून खूप लांब होत जातात. बालक आपल्याभोवती एक कोश निर्माण करतात आणि त्यात पालकांना प्रवेश नसतो.

एक बाळ जन्माला येतं त्या क्षणापासून पालकांकडे अनेक गोड स्मृती असतात बालकांच्या. कालांतराने या स्मृती फक्त पालकांच्या होऊन जातात. बालक त्याच्या वाढत्या वयानुसार ते विसरत जातं. जन्म झाल्यापासून तर सहा ते सात वर्षांपर्यंत बालकांना विशेष काही आठवत नसतं हे शास्त्र सांगतं. त्या काळातील स्मृती फक्त पालकांच्या असतात. पुढे कालांतराने बालकांसाठी त्या त्यांच्या पालकांनी सांगितलेल्या सत्य कथा असतात. स्मृती म्हणून त्यांच्याशी ते जोडलेल्या नसतात. एखाद्या कुटुंबात खूप बिंबवून काही गोष्टी सांगितल्या जातात पण नेमकी तीच रेष बालक ओलांडतात का तर लींीळींूं म्हणून. आता यावर उपाय काय करायला हवे हा प्रश्न शिल्लक उरतोच. पालकांचे बालकाशी कितीही मैत्रीपूर्ण संबंध असले तरी काही गोष्टी तो लपवणारच हे निश्चित आहे. म्हणून आपण पाळलेले आदर्श त्यांनी पाळावेच याचा अती आग्रह न धरता ते पाळले नाही, तर कुठले संभाव्य धोके होऊ शकतात, त्यातून बाहेर पडण्यासाठी काय करावं आणि स्वतःला सुरक्षित कसं ठेवावं याची खुली चर्चा व्हायला हवी. चर्चेदरम्यान पालकांनी बालकांना बोलण्याची व्यक्त होण्याची संधी द्यावी. आधीच एखाद्या बाबतीत नकारात्मक विचार पालकांकडून व्यक्त होत असतील, तर बालक त्यावर काहीही बोलणार नाही. म्हणून खुली चर्चा होणं, ती घडवून आणणं आवश्यक आहे. आपल्या बालकाकडून इतरांना गंभीर ईजा होऊ नये आणि त्याला पण काही नुकसान होऊ नये याची माहिती न चिडता, रागावता चर्चेतून बालकापर्यंत पालक पोहोचवू शकले, तर खूप धोके टाळता येतील. इतरांच्या भावनांची जाण असणं, दुसऱ्याचा त्रास कळणं. हा माणूस असण्याचा पुरावा आहे. ही गोष्ट बालकामध्ये रुजविण्याची पद्धत बदलण्याची गरज आहे. यासाठी बालकांचे समाजीकरण योग्य मार्गाने व्हायला हवं आहे. प्रत्येक पिढीतील व्यक्तीशी बालकांनी बोलायला हवंय. आज आपण बघतो, बालक केवळ त्यांच्या वयातील बालकांशी जास्त संवाद साधतात किंवा फार तर थोड्या मोठ्या बालकांशी बोलतात. ते ही प्रत्यक्ष कमीच. अनुभवांची कक्षा मोठी असलेली व्यक्ती बालकांच्या संपर्कात असली तरी त्यांच्याशी बोलणं त्यांना फारसं आवडत नाही. कारण ते अनुभव केवळ लेक्चर म्हणून आपल्यापर्यंत येत आहेत याची जाणीव बालकास होते आणि त्याला ते नकोसं वाटतं. म्हणून हे अनुभव खुली चर्चा मोकळं बोलणं फक्त शेअरिंग या अंगाने असेल, तर ते बालकाकडून स्वीकारलं जातं. कदाचित जो धडा घ्यायचा तो त्यांचे ते घेतात, पण जर आपण आग्रह कमी केला तर...

# वहिती असलेल्या गायरान जमिनीवर उभे होत असलेले प्रकल्प रोखावे!

## उपविभागीय अधिकारी यांच्याकडे मानवी हक्क अभियानची निवेदनाद्वारे मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

दलीत,आदीवासी ,भुमिहीन हे गायरान जमीनीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवत असल्याने या जमिनीवर शासनाने प्रकल्प उभारु नये अशी मागणी जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे .उपविभागीय अधिकारी , माजलगाव यांच्या कडे दि. ३० जुन २०२५ रोजी मानवी हक्क अभियान च्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्यातील गायरान जमिनीवर दलीत, आदिवासी,भुमिहीन कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असल्याने व त्यांनी या जमिनी नावे होण्यासाठी अनेकदा शासनाने काढलेल्या शासकिय जी.आर नुसार असलेले नियम,अटी ची पुर्तता केलेली प्रस्ताव शासनाकडे दाखल केलेले आहेत परंतु शासनाकडून या जमिनीवर विविध प्रकल्प उभे करून या कुटुंबावर अन्याय केला जात आहे सदरील गायरान जमिनीवर असे कोणतेही प्रकल्प या जमिनीवर उभे करु नयेत अशी मागणी केली आहे या वेळी सांळीबा ता. वडवणी येथील गायरानधारकांनी सुद्द्धा अशी मागणी चे निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे यावेळी मानवी हक्क अभियान चे तालुका कार्याध्यक्ष बाबासाहेब थोरात, रमेश गवळी, संदीप वाघमारे, महादेव उमाप, बंडू लोखंडे, विष्णू मुजमुले, कपील आडागळे, राजेश थोरात आदी मान्यवर सहभागी झाले होते .



# आश्रमशाळेत स्व.वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

**गेवराई । प्रतिनिधी**

हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचे महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात अत्यंत महत्त्वाचे योगदान असून त्यांनी कृषी व औद्योगिक क्षेत्रात अमुलाग्र अशी कामगिरी केलेली आहे. हाताला काम, राहायला घर आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे, ही संकल्पना त्यांनी राबवलेली असून त्यांची संकल्पना अन् विचार आजही तंतोतंत पाळले जातात, असे प्रतिपादन बीडच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक डी.बी.क्षीरसागर यांनी केले.

स्व.वसंतरावजी नाईक यांच्या ११२ व्या जयंती निमित्त मंगळवार, दि.१ जुलै रोजी सुशील शिक्षण संस्था संचलित गेवराई येथील नाईकनगर मधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीचे औचित्य साधून इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला. यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते स्व. वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुशिलभाऊ पवार, तर प्रमुख पाहुणे म्हणून बीडच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक डी.बी.क्षीरसागर, बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष विनोद पौळ, प्राचार्य आर.डी.पवार, मुख्याध्यापक डी.एम. चव्हाण यांच्यासह गेवराई शहरातील विविध वस्तीगृहांचे संचालक आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितलमान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काळे सर व डी एम. चव्हाण यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांनी स्व. वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. श्याम वादे यांनी या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले, तर शेवटी प्राचार्य आर.डी.पवार यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# समिधा फाऊंडेशन व सरहद संस्थेचा उपक्रम

## 'पुस्तक हेच शस्त्र' उपक्रमा अंतर्गत पुस्तक भेट

**दिंद्रुड (प्रतिनिधी)**–महाराष्ट्रातील ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजवण्याचा हेतूने समिधा फाउंडेशन व सरहद पुणे या संस्थांच्या वतीने दिंद्रुड च्या विद्यार्थ्यांना पुस्तक हेच शस्त्र उपक्रमांतर्गत पुस्तक भेट देण्याचा कार्यक्रम शनिवारी पार पडला. दीडशे पुस्तकांचा वाटप याप्रसंगी करण्यात आले.

मुलांच्या मनामध्ये चांगले विचार यावेत, जिज्ञासा आणि आत्मभान निर्माण व्हावे, गुन्हेगारी प्रवृत्ती नाहिशी होण्यासाठी कायद्याचे ज्ञान मिळावे या उद्देशाने पुणे येथील समिधा फाऊंडेशन व सरहद पुणे या संस्थेच्या वतीने राज्यभरात विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाटप करण्यात येते याच अनुसंगाने माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील स्व. सोनाजीराव रांजवन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. संस्थेचे समन्वयक देवराज युवराज ठोंबरे यांनी या उपक्रमाच्या आयोजन केले होते. यावेळी उपस्थित माजी उपसरपंच युवराज ठोंबरे, ग्रा पं सदस्य अतुल चव्हाण, शाळेचे मुख्याध्यापक जि व्ही उजगरे सर, भोसले सर,माऊली कटारे, बारवकर सर,आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सपाटे, पत्रकार गणेश काटकर, शाळेचे शिक्षक वृंद उपस्थित होते.गेल्या काही काळात बीड जिल्ह्यात वाढत चाललेली गुन्हेगारी आणि तरुणांमध्ये वाढणारी हिंसक प्रवृत्ती लक्षात घेता 'पुस्तक हेच शस्त्र' या विचाराने प्रेरित होऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला. वाचनाने निर्माण झालेला विचारांचा प्रभाव यशस्वी जीवनासाठी अमुलाग्रह बदल करतो. म्हणून आम्ही पुस्तक वाटपाचा उपक्रम राबवत आहोत.

–देवराज ठोंबरे,समन्वयक समिधा




# बर्दापूर येथे 'डॉक्टर्स डे' निमित्त आयुर्वेदीय रोग उपचार शिबीर




**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**– अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथे १ जुलै 'डॉक्टर्स डे' निमित्ताने भव्य आयुर्वेदीय रोगनिदान शिबिराचे आयोजन डॉ. शरद पतंगे यांच्या सिद्धिविनायक क्लिनिक च्या वतीने करण्यात आले होते. या शिबिराची सुरुवात असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. शशांक पाठक यांच्या हस्ते धनवंतरी पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. शिबिराच्या सुरुवातीला शिबिराचे आयोजक डॉ शरद पतंगे यांचा व इतर डॉक्टरांचा सन्मान संघटनेचे सचिव डॉ. पांडुरंग बोंद्रे यांच्या हस्ते करण्यात आला. या शिबिरात अग्निकर्म, विद्धकर्म व रक्तकर्म यासारख्या तात्काळ वेदना शमविणाऱ्या उपचारांचा अवलंब करण्यांत आला. उपचार केल्यानंतर तात्काळ वेदना कमी झाल्यामुळे रुग्णांनी समाधान व्यक्त केले.अंदाजे दोनशे रुग्णांवर या शिबिरात उपचार करण्यात आले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी असोसिएशनचे डॉ. श्रीराम काळे, डॉ.आशिष दरगड, डॉ. मयूर काळेगावकर, डॉ.उमाकांत गाढवे, डॉ. अमोल जोशी, डॉ. राहुल वारोडे ,डॉ. प्रशांत साखरे, डॉ.सचिन कस्तुरे, डॉ.विजय सोमवंशी, डॉ.दीपक फुटाणे, डॉ.देवराव चामनर , डॉ.रविन्द्र बाहेती डॉ.अनघा पाठक, डॉ.शीतल दरगड, डॉ.अश्विनी कस्तुरे आणि फारमॉस्टिस प्रियांका पतंगे या पदाधिका–यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. शरद पतंगे यांनी सर्वांचे आभार मानले.

# शेतकरी हा केवळ अन्नदाताच नाही तर जीवनदाता–डॉ.शुभदा लोहिया

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**–शेतीमाती ही खऱ्या अर्थाने सकल प्राणीमात्रांची अन्न देवता आहे, तर त्या शेतीत राबणारा शेतकरी हा अन्नदाता असतो. किंबहुना तो केवळ अन्नदाताच नव्हे तर खऱ्या अर्थाने जीवनदाता आहे असे गौरवोद्गार अंबाजोगाई येथील प्रख्यात हृदयरोग तज्ञ तथा पर्यावरण अभ्यासक डॉ. शुभदा लोहिया यांनी काढले.त्या कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या 'कृषी दिनाच्या' कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे ०१ जुलै रोजी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा कृषी क्षेत्रात भरीव योगदान देणारे हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिमखाना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'कृषि दिनाचे' आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय अंबाजोगाई चे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. संजीव बंटेवाड हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाई येथील प्रख्यात फिजिशियन तथा पर्यावरणवादी, पर्यावरण अभ्यासक डॉ. शुभदा लोहिया या होत्या. तसेच व्यासपीठावर डॉ. राजू महाजन, डॉ. दीपक लोखंडे, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ शुभदा लोहिया पुढे बोलताना असेही म्हणाल्या की, आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये वृक्षवल्ली, पशु–पक्षी यांना देवतांची प्रतिके मानलेली आहेत. कारण मानव हा श्रद्धाळू आहे. परिणामी त्या माध्यमातून निसर्गाचे व पर्यावरणाचे संवर्धन व्हावे हा त्यामागचा हेतू आहे. आपल्या अध्यक्षीय समारोपात सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. संजीव बंटेवाड म्हणाले की, कृषिच्या विद्यार्थ्यांनी शेतकरी व शेती यांच्याशी निष्ठा राखून कृषि शिक्षण घेतले पाहिजे व आपल्या ज्ञानाचा उपयोग सजग समाजभान राखून शेती, शेतकरी व देशाच्या हितासाठी केला पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी– राजेश रेवले यांनी केले ,तर आभार डॉ. योगेश वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमानंतर वृक्षदिंडी काढून सुमारे 'शंभर आम्रवृक्ष लागवड' हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक, अधिकारी यांनी यांनी सहभाग नोंदवून योगदान दिले.



# भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण कोणीही अर्ज न भरल्यामुळे बिनविरोध निवड

## विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून सूत्रे स्वीकारली

**मुंबई । वृत्तसंस्था**

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरु असलेल्या महाराष्ट्राच्या भाजप प्रदेशाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे आमदार रवींद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. मुंबईत आयोजित विशेष कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी निरीक्षक असलेले केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष पदासाठी रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी आपला अर्ज केंद्रीय निरीक्षक किरेन रिजुजी यांच्याकडे दाखल केला होता. मात्र, अन्य कोणीही अर्ज न भरल्यामुळे रवींद्र चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली.रवींद्र चव्हाण यांनी विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून चव्हाण हे सूत्रे स्वीकारली आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, विनोद तावडे यासह भाजपचे सर्व आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.मुंबई महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद अशा विविध स्तरांवरील निवडणुका तोंडावर आहेत. या निवडणुकांत भाजपला यश मिळवून देण्याची मोठी जबाबदारी आता चव्हाण यांच्यावर असणार आहे. पक्षसंघटनेला गती देणे, स्थानिक पातळीवरील गटबाजी संपवणे आणि नव्या नेतृत्वाला पुढे आणणे या प्रमुख आव्हानांना ते कशा प्रकारे सामोरे जातात, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

रवींद्र चव्हाण हे डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. ते २००९ पासून सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. अलीकडच्या निवडणुकीत तब्बल ५० हजारांहून अधिक मताधिक्य मिळवत विजयी झाले होते. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये ते कॅबिनेट मंत्री झाले होते. त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली.रवींद्र चव्हाण यांच्याकडे भाजपने २००२ साली कल्याण उपजिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली होती. २००५ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करत कल्याण–डोंबिवली महापालिकेत नगरसेवक झाले होते. २००७ मध्ये ते स्थायी समितीचे सभापती झाले. २००९ साली कल्याण विधानसभा मतदारसंघाचे विभाजन होऊन डोंबिवली हा स्वतंत्र मतदारसंघ तयार झाला. त्यानंतर झालेल्या प्रत्येक विधानसभा निवडणुकीत रवींद्र चव्हाण यांनी वर्चस्व मिळवले आणि मोठा विजय देखील मिळवला. त्यानंतर २०१६ साली त्यांना राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आमदारकी मिळवण्याची हॅटट्रीक पूर्ण केली.चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये महाराष्ट्र भाजप प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यभार हाती घेतला. ओबीसी चेहरा असणाऱ्या बावनकुळेंच्या नेतृत्वात पक्षाने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तब्बल १३२ जागा जिंकून अभूतपूर्व यश मिळवले. बावनकुळे यांनी भाजपची स्थानिक पातळीवरील रचना मजबूत केली. १.५ कोटी नवीन प्राथमिक सदस्य व ५ लाख सक्रिय कार्यकर्ते जोडण्यात यश मिळवले. बूथ स्तरापासून ते जिल्हा पातळीपर्यंत संघटनात्मक निवडणुका आणि नियुक्त्यांचे नियोजन केले. यामुळेच लोकसभा निवडणुकीत भाजपला केवळ ९ जागा मिळाल्या असल्या तरी, बावनकुळेंनी त्यातून धडा घेऊन विधानसभा निवडणुकीत बूथस्तरीय व्यवस्थापन करून भाजपला यश मिळवून दिले.



# 'अभि नहीं तो कभी नहीं' हे लक्षात ठेवून आझाद मैदानावरील आंदोलनात

# बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्प्यासाठी लागणारा निधी मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती महाराष्ट्र राज्य व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. तसेच बुधवार दि.०२ जुलै रोजी शिक्षक आमदार आणि पदवीधर आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशानुसार निधी उपलब्ध करून द्या या मागणीचे निवेदन दिले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षक व पदवीधर आमदारा सोबत तात्काळ निधी संदर्भात बैठक घेऊन मार्ग काढु सांगितले आहे. त्यामुळे सर्व आमदार त्यांच्या परीने प्रयत्न करीत आहेत. दुसरीकडे आंदोलनस्थळी शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची गरज आहे. तसेच शिक्षक समन्वयक संघाने ८ व ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. या बंदमध्ये बीड जिल्ह्यातील सर्व शाळेचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळा बंद करून मोठ्या संख्येने आंदोलनाला उपस्थित रहावे असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला आहे. परंतु सलग नवीन सरकारचे तीन अधिवेशन झाली. या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झालेली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा हिरमोड झाला. विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्पा





अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानात महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर,उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर ,उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर, जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव सुरेखा गायकवाड मॅडम बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर,माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर ,परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

# पिसाळलेल्या श्वानाचा केजमध्ये धुमाकुळ;आठ जण जखमी

### वेळेवर हस्तक्षेप करत सामाजिक कार्यकर्त्यांनी श्वानाला केले ठार

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील केज-बीड मुख्य रस्त्यावर बुधवारी सकाळच्या सुमारास एका पिसाळलेल्या काळ्या रंगाच्या श्वानाने शहरात धुमाकुळ घालत तब्बल आठ जणांना चावा घेत गंभीर जखमी केले. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं.

ही बाब सामाजिक कार्यकर्ते विकास मस्के व त्यांच्यासोबत असलेल्या चार तरुणांच्या लक्षात येताच, त्यांनी अत्यंत समयसूचकता आणि धाडसाने या पिसाळलेल्या श्वानाचा पाठलाग सुरू केला. काही वेळातच त्यांनी श्वानाला केज पोलीस ठाण्याच्या आवारात गाठून ठार केले.



या श्वानाने केवळ काही मिनिटांत आठ नागरिकांवर हल्ला चढवून चावा घेतल्यामुळे रक्तबंबाळ अवस्था निर्माण झाली होती. स्थानिक नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती. मात्र, विकास मस्के आणि त्यांच्या टीमच्या धाडसी कृतीमुळे मोठा अनर्थ टळला. प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेता, नागरिक व स्थानिक प्रशासनाकडून या सामाजिक कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. जर वेळेवर श्वानाला ठार केले गेले नसते, तर अनेक जीवितहानी होण्याची शक्यता होती, असे स्थानिकांनी सांगितले. जखमी नागरिकांवर केज उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. या घटनेमुळे भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबाबत केज नगरपंचायत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# आरणगाव दुमाला त्या व्हिडीओ बद्दल होणार चौकशी;त्या मृत व्यक्तीला मिळणार का न्याय?

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

श्रीगोंदा तालुक्यातील आरणगाव दुमाला येतील एका बन्सी आढाव व्यक्ती चा सौंशयास्पद मृतदेह कॅनॉल मध्ये आढळून आला होता परंतु त्यावेळी पुराव्या अभावी त्या मृत व्यक्तीच्या संशयितास सोडण्यात आले होते परंतु त्याच्या वडिलांची खळबळजक व्हिडीओ समोर आला असून त्यात गुन्हा कसा घडला व त्यासाठी कसे लाखो रुपये देऊन मुलाची सुटका करून घेतली या बाबत सविस्तर चरच्या दिसून येत आहे यामुळे सर्वच स्तरात संताप व्यक्त होत आहे याची उच्च स्तरीय चौकशी व्हावी व मृत व्यक्तीस न्याय मिळावा यासाठी काही ग्रामस्थ पाठपुरावा करणार आहेत..

सविस्तर वृत्त असे कि आरणगाव दुमाला येथील बन्सी आढाव हे पाटकरी कुकडी येथे कार्यरत होते यातच त्यांचे खात्यातील विठ्ठल चंद्रकांत पोटे हेही त्याच खात्यात काम करत होते दोघेई एकाच गावात असल्याने त्यांची घनिष्ठ मैत्री असल्याचे दिसून येत होते परंत त्यांच्यात एका गोष्टी मधून वाद असल्याचे या व्हिडीओ मधून दिसत आहे बन्सी आढाव यांचा मृतदेह कुकडी कॅनॉल मध्ये बेवारस तरंगताना त्यावेळी दिसून आला होता संशय म्हणून विठ्ठल पोटे यास अटक व तपास सुरु होता परंतु सबळ पुरावे नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तत्ता करण्यात आली परंतु सराईत असलेल्या गुन्हेगारा प्रमाणे विठ्ठल पोटे व त्यांचे कुटुंबीय इतर व्यक्तींना भीती दाखवण्यासाठी केलेला गुन्हा व तो कश्या पद्धतीने आम्ही मिटवीला आमची दहशत कशी आहे यासाठी वापर करत होते यातच त्यांनी केलेला गुन्हा व त्याबाबत केलेली वाच्यता सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत असून यामुळे तपास यंत्रणा व न्याय व्यवस्था यावरच प्रश्न चिन्ह उभे राहिले? अशी नागरिकांची भूमिका आहे लाखो रुपये खर्च करून मोकाट सुटलेल्या पोटेची पुन्हा चौकशी होणार? बन्सी आढाव यांच्या मृत्यूचा पुन्हा खुलासा होणार? मृत व्यक्तीला न्याय मिळणार? व्हिडिओत म्हंटल्या प्रमाणे गुन्हा लपवण्यासाठी सहकार्य करणारे पपू,नातेवाईक व गुरुजींची चौकशी होणार असे एक न अनेक प्रश्न या मुळे उपस्थित झाले असून या मृत्यूची दखल घ्यावी म्हणून वरिष्ठ स्थरावर ग्रामस्थ व सुजाण नागरिक प्रयत्न करणार आहेत.

# रूपामाता नॅचरल शुगरने ऊस बिलाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात केले वर्ग-ॲड.गुंड

**माजलगाव । प्रतिनिधी**

रोषणपुरी येथील रूपामाता नॅचरल शुगरचे ऊस बिलाचे पैसे २७०० रूपयाने शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केले आहेत यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

शेतकऱ्यांनी आपापले खाते तपासून घ्यावे मागील काही दिवसांपासून काही लोकांकडून जाणीवपूर्वक रूपामाता नॅचरल शुगरचे नाव वैयक्तिक हेतू पुरस्सर बदनाम करण्यासाठी प्रयत्न केले जात होते आणि शेतकऱ्यांचे बिले थकविल्याचे सांगून शेतकऱ्यांना चिंताग्रस्त करण्याचे काम काही लोकांकडून होताना दिसत होते कोणाच्याही भूलथापांना शेतकऱ्यांनी बळी पडू नये असे पण यावेळी सांगण्यात आले.



शेतकऱ्यांच्या खात्यावर ऊस बिलाचे २७०० प्रति टणाप्रमाणे पैसे वर्ग करण्यात आलेले असून यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केलेला आहे रूपामाता नॅचरल शुगर हे सदैव शेतकऱ्यांच्या हितासाठीच असून यामध्ये कोणाचेही पैसे बुडवण्याचा हेतू नसतो परंतु काही कारणास्तव ऊस बिल अदा करण्यासाठी विलंब झाला होता याचा फायदा घेऊन काही लोकांनी या कारखान्याचे नाव खराब करण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु त्यांचे हे प्रयत्न असफल झालेले आहेत व ज्या शेतकऱ्यांचे ऊस बिलाचे पैसे कारखान्याकडे होते त्यांचे पैसे खात्यात वर्ग करण्यात आलेले आहेत अशी माहिती कारखान्याचे चेअरमन ॲडव्होकेट व्यंकटराव गुंड यांनी दिली आहे .

माजलगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेला रुपामाता कारखाना नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करत असून या कारखान्याकडून कसलेही प्रकारची फसवणूक केली जाणार नाही या परिसरातील शेतकऱ्यांनी आपला ऊस आमच्या कारखान्यास देऊन सहकार्य करावे असे आवाहन चेअरमन एडवोकेट व्यंकटराव गुंड तसेच संचालक एडवोकेट अजितराव गुंड,भाऊसाहेब गुंड व कारखाना संचालक मंडळ यांनी केले आहे.

# रोटरीच्या वतीने सिड बॉल रोपण प्रकल्प

**बीड (प्रतिनिधी):** दि. १ जुलै रोजी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउन, पतंजली योग समिती बीड, बीड ट्रेकर्स ग्रुप, देवराई ग्रुप व आनंदग्राम पाली यांच्या संयुक्त विद्यमाने कपिलधार ते मांजरेसुंबा दरम्यान असलेल्या डोंगररांगांमध्ये सिड बॉल रोपण प्रकल्प यशस्वीरित्या पार पडला. या उपक्रमात १७०० पेक्षा अधिक देशी झाडांचे सिड बॉल्स व ३०० पेक्षा अधिक बीज रोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेचे रक्षण करण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या उपक्रमाचे आयोजन रोटरीच्या नवीन वर्षाच्या शुभारंभानिमित्त करण्यात आले.या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउनचे अध्यक्ष इंजी. राहुल बोरा, सचिव डॉ. प्रकाश कोंका, आनंदग्रामचे संचालक दत्ता बारगजे, पर्यावरण प्रकल्प प्रमुख डॉ. शिवाजी देशमाने, रो. डॉ. सुरेंद्र बजाज, रो. दिनेश लोळगे, रो. इंजी. अमोल तळेकर, बाबासाहेब कुडके सर आणि रो. लक्ष्मण मळेकर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या



उपस्थितीत पार पडलेला हा उपक्रम प्रकृती संवर्धनासाठी एक पाऊल पुढे या संकल्पनेशी सुसंगत ठरला असून, भविष्यात पर्यावरणपूरक समाजनिर्मितीसाठी तो नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. याप्रसंगी मोठ्या संख्येने रोटरीयन्स आणि इतर सामाजिक संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने काष्टी येथील परिक्रमा पॉलिटेक्निकला अतिउत्कृष्ट श्रेणी प्रदान

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

काष्टी येथील मा.श्री.बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट संचलित परिक्रमा पॉलिटेक्निक महाविद्यालयातील सिव्हिल, इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल या विभागांना महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी अतिउत्कृष्ट श्रेणी प्रदान करण्यात आली त्याबरोबर कॉम्प्युटर व मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स या दोन विभागांना उत्कृष्ठ श्रेणी प्रदान करण्यात आली. एकाचवेळी तीन विभागांना अतिउत्कृष्ट श्रेणी मिळवणारे परिक्रमा पॉलिटेक्निक हे श्रीगोंदा तालुक्यातील पहिले महाविद्यालय ठरले. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या सर्वेक्षण समितीने महाविद्यालयास भेट दिली व त्याअंतर्गत महाविद्यालयाचे कामकाज व सुविधांची तपासणी करून ही श्रेणी प्रदान केली. या नेत्रदीपक यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक माजी मंत्री बबनरावजी पाचपुते, अध्यक्षा डॉ.सौ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार श्री.विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ड. प्रतापसिंह पाचपुते, कॅडमीक डायरेक्टर सौ.इंद्रायणी पाचपुते, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, अती.कॅडमीक डायरेक्टर डॉ.संजिवन कदमपाटील, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, इंजीनिअरिंग प्रभारी प्राचार्य मोहन धगाटे, एम.बी.ए. डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, बी.फार्मसी प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ डी.फार्मसी प्राचार्य रमेश शिंदे, सायन्स कॉलेज प्राचार्य डॉ. पांडुरंग इथापे यांनी अभिनंदन केले. परिक्रमा तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077